
## सहवेदना

### ज्ञानदेव जाधव



**दुशेरे :** गोळेश्वर (ता. कराड) येथील ज्ञानदेव पांडुरंग जाधव (वय ९७) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, मुली, पुतणे, सूना, नातवंडे व परतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा अतिशय कष्टाळू स्वभाव होता. माजी जिल्हा परिषद सदस्या विजया पाटील व प्रगतशील शेतकरी प्रल्हाद जाधव तसेच भगवानराव जाधव यांचे ते वडील होत. रक्षाविसर्जन विधी शुक्रवारी १४ रोजी सकाळी ९ वाजता गोळेश्वर येथील स्मशानभूमीत होणार आहे.

### गोविंदराव शिंदे



**वरकुटे :** राणंद (ता.माण) येथील गोविंदराव विठ्ठलराव शिंदे (वय ८६) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व नवचैतन्य हायस्कूलचे माजी शिक्षक होते. डॉ. प्रदीप शिंदे यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. रक्षाविसर्जन शनिवारी सकाळी ७.३० वाजता होणार आहे.

### गजराबाई मोटे



**वरकुटे :** मोटेवाडी (वरकुटे) येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ. गजराबाई नागदेव मोटे (वय ७८) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. वरकुटे ग्रामपंचायतीचे सरपंच मारुती मोटे यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. रक्षाविसर्जन शुक्रवारी सकाळी ७ वाजता होणार आहे.

### अतुल भोसले



**वाठार किरोली :** शिरंबे येथील प्रगतशील शेतकरी अतुल कबीर भोसले (वय ४४) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, बहीण, पत्नी, एक मुलगा , दोन मुली असा परिवार आहे. रक्षाविसर्जन व दशक्रिया विधी शुक्रवार १४ रोजी सकाळी साडेआठ वाजता शिरंबे स्मशानभूमीत होणार आहेत

### दंत तपासणी शिबिर

**कराड :** स्वातंत्र्यदिनानिमित्त येथील कृष्णा नाक्यावरील आनंदज्योती टोटल ओरल केअरतर्फे शनिवारी १५ रोजी मोफत दंत तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजन केले आहे. डॉ. अमरदीप शिंदे, डॉ. कांचन शिंदे उपचार व मार्गदर्शन करणार आहेत.

REG. NO. SAT / KRD / RSR (CR) 730 / DATE 20 MARCH 1986

**कृष्णा-कोयना नागरी सहकारी पतसंस्था मर्या., कराड**

प्रशासकीय कार्यालय - १३५ / २, मंगळवार पेठ, कराड, जि.सातारा.

ISO 9001: 2015

**४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
(फक्त सभासदांकरिता)

स. न. वि. वि.

कृष्णा - कोयना नागरी सहकारी पतसंस्था मर्या., कराड. या **संस्थेची ४१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.३०/०८/२०२६ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता 'कल्याणी पॅलेस' , वाखाण रोड, कराड येथे** संस्थेचे चेअरमन मा. श्री. बाळासो शामराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली बोलविणेत आली आहे. तरी संस्थेच्या सर्व सभासदांनी सभेस वेळेत उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**• सभेपुढील विषय •**

१) मागील दि. १०/०८/२०२५ रोजी झालेल्या ४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृतांत वाचून कायम करणे.
२) मा. संचालक मंडळाने सादर केलेले सन २०२५ - २०२६ सालचे ताळेबंद व नफा - तोटा पत्रकास वाचून मंजुरी देणे.
३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२५-२०२६ च्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
४) सन २०२५ -२०२६ चे वैधानिक लेखातपासणी अहवालाची नोंद घेणे.
५) सन २०२४ - २०२५ चे वैधानिक लेखातपासणी दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
६) सन २०२६ -२०२७ चे अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०२५ -२०२६ चे अंदाज पत्रकापेक्षा कमी / जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
७) सन २०२६ - २०२७ सालाकरीता वैधानिक लेखापरीक्षक यांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८) मा. संचालक मंडळ व नातेवाईक यांचे कर्जाची नोंद घेणे.
९) संस्थेच्या शाखा कार्यालयाकरिता स्वत:च्या मालकीची जागा अथवा इमारत खरेदी करणेस मंजुरी देणे.
१०) संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत करणे.
११) मा. अध्यक्षसो यांचे परवानगीने आयत्या वेळी येणारे विषयांवर विचार करणे.
१२) आभार व समारोप.

**स्थळ :** कराड
**दिनांक :** १४/०८/२०२६

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरुन
**श्री. अरुण शंकर पाटील**
महाव्यवस्थापक

**सूचना** - १) गणपुर्ती अभावी सभा तहकूब झालेस सदरची सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेपेक्षा अर्धा तास उशिरा घेतली जाईल. व त्या सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही. २) सभासदांनी सभेपुढे ठेवावयाच्या आपल्या लेखी सूचना वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी किमान ४ दिवस अगोदर संस्थेच्या मुख्य कार्यालयाकडे पाठवाव्यात. ३) दि.३१/०३/२०२६ अखेरील ताळेबंद व नफा-तोटापत्रक व वार्षिक अहवाल संस्थेच्या वेबसाईट www. krishnakoyanapatsanstha.in व मुख्य कार्यालयासह सर्व शाखांचे नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करणेत आलेला आहे. ४) सभेस येताना आपली सभेची नोटीस प्रत सोबत आणावी ही विनंती.

## चार राष्ट्रीय दिनी तर उर्वरित दोन ग्रामसभा ग्रामपंचायतीच्या सोयीनुसार

# आता वर्षाला सहा ग्रामसभा बंधनकारक

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ७ नुसार आजपर्यंत वर्षाला ४ ग्रामसभा घेण्याची तरतूद आहे. मात्र, आता यापुढे वर्षाला ६ ग्रामसभा घेण्याबाबत केंद्रीय पंचायती राज मंत्रालयाच्या निर्देशानुसार आदिवासी विकास आयुक्तालयाचे सहसंचालक (नियोजन) किरण जोशी यांनी १२ ऑगस्ट रोजी राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना याबाबत निर्देश दिले आहेत.**

■ **विजय जाधव, गोडोली**

**त. भा. वृत्तसेवा :** केंद्रीय पंचायती राज मंत्रालयाच्या मार्गदर्शनानुसार देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये दरवर्षी ६ ग्रामसभा आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार ४ ग्रामसभा राष्ट्रीय महत्त्वाच्या दिवशी, तर उर्वरित २ ग्रामसभा संबंधित ग्रामपंचायतीच्या सोयीनुसार घेण्यात येणार आहेत.

गावाच्या विकासाचे निर्णय, शासकीय योजनांची अंमलबजावणी, ग्रामपंचायतीच्या कामकाजावर देखरेख आणि नागरिकांचा थेट सहभाग यासाठी ग्रामसभा हा लोकशाहीचा महत्त्वाचा पाया मानला जातो. वर्षाला ४ ग्रामसभा असूनही अनेकदा कोरमअभावी सभा तहकूब होतात. निवडणुकीच्या काळात जोशात असणारे कार्यकर्ते ग्रामसभेकडे मात्र पाठ फिरवतात. राज्यात अनेक ठिकाणी वॉर्डसभा होत नाहीत, तर महिला सभाही अल्प उपस्थिती, केवळ कागदोपत्री सह्यांपुरत्याच मर्यादित असल्याचे चित्र आहे. त्यामुळे आता ६ ग्रामसभा घेण्याचा आदेश काढला असला तरी त्यातून प्रत्यक्षात काय साध्य होणार, हा प्रश्न आहे. अन्यथा हा केवळ आकड्यांचा खेळ ठरेल. ग्रामसभेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ते नागरिकांना पटवून देण्याची गरज आहे. गावोगावी राजकीय रणकंदनामुळे ग्रामसभांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. या सभेला उपस्थित राहून ग्रामपंचायतीच्या कामकाजाची माहिती करून घेऊन निर्णय प्रक्रियेत सहभागी व्हावे. यापुढे सभेला उपस्थित म्हणून सह्या नको, प्रत्यक्ष उपस्थित रहावे, असे आवाहन पंचायत राज प्रशिक्षण केंद्राचे प्रविण प्रशिक्षण सुरेंद्र चव्हाण यांनी केले.

> **ग्रामसभा सक्षम तरचं शाश्वत विकास**
> **ग्रामपंचायतीच्या कामकाजावर तसेच गावात कार्यरत असलेल्या स्थानिक शासकीय कर्मचाऱ्यांवर ग्रामसभेचे नियंत्रण असते. गावाच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी लोकसहभाग अत्यंत आवश्यक आहे. गावाशी संबंधित महत्त्वाचे निर्णय ग्रामसभेतच झाले पाहिजेत. त्यामुळे ग्रामसभेचे महत्त्व ओळखून प्रत्येक नागरिकाने ग्रामसभेला उपस्थित राहून आपली भूमिका मांडली पाहिजे.**
> ■ **रवींद्र माने, सरपंच, आदर्श गाव मान्याचीवाडी (पाटण)**

**ग्रामसभांचे निश्चित वेळापत्रक**
१) २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन
२) २४ एप्रिल राष्ट्रीय पंचायती राज दिन
३) १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन
४) २ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती



पाटण : तिरंगा रॅलीमध्ये सहभागी याज्ञसेन पाटणकर व भाजप पदाधिकारी.

## पाटणमध्ये तिरंगा रॅलीला प्रतिसाद

**त. भा. वार्ताहर**

**पाटण :** भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर भाजपचे जिल्हा सरचिटणीस याज्ञसेन पाटणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत तिरंग्याचा सन्मान आणि राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करणारी तिरंगा रॅली उत्साही वातावरणात झाली.

येथील कै. ज्ञानोजीराव साळुंखे हायस्कूलच्या क्रीडांगणावर याज्ञसेन पाटणकर तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत तिरंगा रॅलीस शुभारंभ करण्यात आला. रॅलीमध्ये शहरासह मतदारसंघातील भाजपचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, नगरसेवक, नागरिक तसेच विविध विद्यार्थी–विद्यार्थिनी, शिक्षक, नागरिक सहभागी झाले होते. रामापूर, नवीन बसस्थानक, झेंडा चौक, लायब्ररी चौक, राजवाडा, सिद्धार्थनगर, तहसील कार्यालय अशी मार्गक्रमण करणाऱ्या तिरंगा रॅलीचा वंदे मातरम् गायनाने समारोप झाला.

## ग्रामपंचायतीच्या प्रवेशद्वारावर आमरण उपोषण

**त. भा. प्रतिनिधी**

**उंब्रज :** उंब्रज (ता. कराड) येथील शासकीय जागेवरील अतिक्रमण हटवण्यासह ग्रामसेवकांकडून झालेल्या कथित अपमानास्पद वागणुकीबाबत आणि चुकीच्या कारवाईविरोधात रामदास दिलीप काटवटे यांनी ग्रामपंचायतीच्या प्रवेशव्दारावर आमरण उपोषण सुरू केले आहे. गुरुवारी या उपोषणाचा चौथा दिवस असून, प्रशासनाकडून मागण्यांवर ठोस कार्यवाही न झाल्याने आंदोलनाची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.

काटवटे यांनी यापूर्वी विविध मागण्यांसंदर्भात तसेच ग्रामसेवक समाधान माने यांच्याबाबत प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे तक्रारी व निवेदने सादर केली आहेत. संबंधित प्रकरणाची विभागीय चौकशी करून कठोर कारवाई करावी, तसेच तातडीने कार्यवाही न झाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला होता.



उंब्रज : उपोषणास बसलेले रामदास काटवटे.

ग्रामसेवक समाधान माने यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे उल्लंघन करून माहिती देण्यास टाळाटाळ करणे, नागरिकाशी अरेरावी व गैरवर्तणूक करणे, दुजाभावाची वागणूक देणे याबाबत विभागीय चौकशी करून लागू सेवा नियमांनुसार निलंबनासह कठोर शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत तसेच तत्काळ कारवाई न झाल्यास आमरण उपोषणास सुरू असल्याचे काटवटे यांनी सांगितले.

याबाबत जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभागाकडून गटविकास अधिकारी, पंचायत समिती कराड यांना तातडीने कार्यवाही करण्याबाबत पत्र देण्यात आले. त्यामध्ये ग्रामसेवक समाधान माने यांच्यावर विभागीय चौकशी करून नियमानुसार कारवाई करण्याची मागणी रामदास काटवटे यांची आहे. यापूर्वी रामदास काटवटे यांनी उंब्रज बाजारपेठेत आंदोलन सुरू केले होते. त्यावेळी तहसीलदार कल्पना ढवळे यांनी भेट देऊन दिलेल्या तोंडी आश्वासनाची पुर्तता न झाल्यामुळे १० ऑगस्टपासून काटवटे यांनी पुन्हा बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे.

## प्रस्तावित नेकलेस रोडचे पालिकेत सादरीकरण

**त. भा. प्रतिनिधी**

**कराड :** शहराभोवतीच्या नेकलेस रोड प्रकल्प व यशवंतराव चव्हाण समाधी परिसर सुशोभीकरणाबाबत पालिका सभागृहात सार्वजनिक बांधकाम विभागाने या प्रकल्पाच्या आराखड्याचे सादरीकरण केले.

नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, उपनगराध्यक्ष प्रतापराव साळुंखे, लोकशाही आघाडीचे अध्यक्ष जयंत काका पाटील, विरोधी पक्षनेते विजय वाटेगावकर, मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर, सत्ताधारी यशवंत व लोकशाही आघाडीसह विरोधी भाजपचे नगरसेवक उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता देसाई यांनी चित्रफितीसह सादरीकरण केले. यशवंतराव चव्हाण समाधीस्थळ सुशोभीकरण, वाहतूक सुलभीकरण, रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट व पर्यावरण रक्षण या चार बाजूंचा विचार या प्रकल्पाचा विकास आराखडा तयार करताना करण्यात आला आहे. एकूण ६८० कोटी रुपयांचा हा प्रकल्प असून त्याचा प्राथमिक आराखडा तयार केला आहे. यात जुन्या कोयना पुलापासून नवीन कृष्णा पुलापर्यंत पूल असणार आहे. नदीकाठी घाट, सुशोभीकरण, बगीचा यांचाही समावेश आहे, असे सांगण्यात आले.

या आराखड्याबाबत नगरसेवकांनी शंका, प्रश्न उपस्थित केले. त्यास देसाई यांनी उत्तरे दिली. या प्रकल्पाचे सादरीकरण हे प्राथमिक असून आणखी अद्ययावत थ्रीडी प्रेझेन्टेशन सादर करावे, असे नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांनी यावेळी सांगितले. सार्वजनिक बांधकाम व पालिकेची समिती तयार करून या प्रकल्पासह बांधकामच्या इतर कामांबाबत समन्वय साधण्याचे ठरले.



कराड : नेकलेस रोड प्रकल्पाची माहिती उपअभियंता देसाई यांच्याकडून घेताना नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव व नगरसेवक.

## दोन म्हशी व रेडकू चोरीचा पर्दाफाश

**त. भा. वार्ताहर**

**कुडाळ :** कुडाळ (ता. जावळी) येथील शेतकऱ्याच्या मालकीच्या दोन म्हशी व एका रेडकाची चोरी करून त्यांची परस्पर विक्री केल्याप्रकरणी मेढा पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले आहे. पोलिसांच्या तपासात चोरीला गेलेल्या जनावरांपैकी एक म्हैस व रोख रक्कम असा एकूण १ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कुडाळ येथील वैशाली दत्तात्रय पवार यांच्या मालकीच्या दोन म्हशी व एका रेडकाची चोरी झाली होती. चोरट्यांनी म्हशींच्या गळ्यातील कंडे व दोर कापून तसेच गोठ्याच्या बाजूची लोखंडी तार तोडून जनावरे लंपास केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले होते.

याप्रकरणी सूर्यकांत चव्हाण (रा. पाचवड), संदेश पिसाळ (रा. व्याजवाडी) व हर्षद चव्हाण (रा.कडेगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. चोरी केलेली म्हैस काष्टी (ता. श्रीगोंदा) येथील आठवडा बाजारात विकल्याचे समोर आले आहे. तपासात एका संशयिताने एक म्हैस व एक रेडकू ५० हजार रुपयांना विकले. सदर म्हैस ओळखल्यानंतर पोलिसांनी पंचांसमक्ष तिचा पंचनामा करून ती तपासकामी जप्त केली.

## पोलीस डायरी

### वाहन मागे घेण्यावरून तरुणाला मारहाण

**सातारा :** वाहतूक कोंडीमध्ये वाहन मागे घेण्यावरून झालेल्या वादातून एका तरुणाला शिवीगाळ करून हाताने मारहाण केल्याची घटना एलबीएस कॉलेजसमोर घडली. ही घटना १२ ऑगस्ट रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अथर्व सचिन शिंदे (रा. शनिवार पेठ, सातारा) आणि संशयित हे आपापल्या दुचाकीवरून जात होते. यावेळी रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असल्याने अथर्व शिंदे यांना 'तुझी गाडी मागे घे' असे सांगितले. मात्र, वाहतूक कोंडीमुळे शिंदे यांना दुचाकी मागे घेता आली नाही. याचा राग आल्याने शिंदे यांना शिवीगाळ करून हाताने मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी अथर्व शिंदे यांनी सातारा शहर पोलीस ठाण्यात सॅम बागवान (पूर्ण नाव माहिती नाही, रा. पीरवाडी, ता. सातारा) याच्या विरोधात फिर्याद दिली. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक गोसावी करीत आहेत.

### चाळकेवाडीतून कॉपर केबलची चोरी

**सातारा :** चाळकेवाडी (ता. जि. सातारा) येथील महाऊर्जा साईटवरून चोरट्याने सुमारे २० हजार रुपये किमतीची कॉपर केबल चोरून नेल्याची घटना घडली. ही घटना ९ ऑगस्ट रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चाळकेवाडी येथील महाऊर्जा साईटवरील पवनचक्कीच्या खालील बाजूस असलेल्या कंट्रोल रूमजवळ कॉपर केबल ठेवण्यात आली होती. चोरट्याने ही केबल चोरून नेली. या केबलची किंमत सुमारे २० हजार रुपये आहे. याप्रकरणी महाऊर्जा संस्था, चाळकेवाडी साईट येथील राजेंद्र नामदेव पवार (रा. शाहूपुरी, सातारा) यांनी सातारा तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा अधिक तपास पोलीस हवालदार कर्णे करीत आहेत.

### संशयास्पद वावरणाऱ्यावर गुन्हा दाखल

**सातारा :** शाहूपुरी चौक ते दिव्यनगरी मार्गावर न्यू सनडाऊन हॉटेलच्या आडोशाला चेहऱ्यावर रुमाल बांधून अंधारात संशयास्पद उभ्या असलेल्या व्यक्तीविरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ ऑगस्ट रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास शाहूपुरी चौक ते दिव्यनगरी जाणाऱ्या रस्त्यावर न्यू सनडाऊन हॉटेलच्या आडोशाला धनंजय राजेंद्र पंडित (रा. गुरुवार पेठ) हा इसम चेहऱ्यावर रुमाल बांधून अंधारात उभा असल्याचे आढळून आले. संशयिताने स्वत:चा चेहरा झाकून आपले अस्तित्व लपविले होते. तसेच, कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने तो तेथे उभा असल्याचा पोलिसांचा संशय आहे. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल रोहित बाजारे यांनी शाहूपुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून धनंजय राजेंद्र पंडित याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनेचा अधिक तपास पोलीस कॉन्स्टेबल फरांदे करीत आहेत.

### राधिका रोडवरून दुचाकीची चोरी

**सातारा :** शहरातील राधिका रोड परिसरात पार्किंगमध्ये लावलेली दुचाकी चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली. या वाहनाची किंमत ५५ हजार रुपये असून, चोरीची घटना ६ ऑगस्ट रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राधिका रोडवरील सिटी वाईन शॉपच्या पाठीमागे नंदादीप हॉस्पिटलजवळील रस्त्याच्या पार्किंगमध्ये तक्रारदारांनी दुचाकी उभी केली होती. चोरट्याने वाहन तसेच त्यासोबत असलेले मूळ आरसी बुक चोरून नेले. याप्रकरणी शकील निजाम फरास (रा. नेले) यांनी शाहूपुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून वाहन चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनेचा अधिक तपास पोलीस हवालदार काटकर करीत आहेत.

### गतिमंद मुलीवर अत्याचार

**सातारा :** जावली तालुक्यातील एका गावात गतिमंद तरुणीचा गैरफायदा घेत तिच्यावर शारीरिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी मेढा पोलीस ठाण्यात एका व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जावली तालुक्यातील एका घरात संबंधित तरुणी एकटी असताना एकाने घरात प्रवेश केला. पीडित तरुणी गतिमद असल्याची माहिती असतानाही आरोपीने तिचा गैरफायदा घेत तिच्यावर तीन वेळा जबरदस्तीने अत्याचार केल्याचा आरोप आहे. फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

जा. क्र.२९७८ /स्थावर लिलाव/
वसुली अधिकारी, सातारा जिल्हा सह. पतसंस्था फेडरेशन लि., सातारा
दि. १२/०८/२०२६

**स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव**

तमाम लोकांना कळविणेत येते की, **यशवंत ग्रा. बि. शेती सह. पतसंस्था मर्या., बनवडी पार्ले, ता. कराड,जि. सातारा** या संस्थेचे खालील नामनिर्देशीत केलेले सभासद थकबाकीदार आहेत. त्यांचेकडील थकबाकी रक्कम वसुलीसाठी त्यांच्या खालील नमूद केलेल्या स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या तारखेस, वेळी व ठिकाणी होणार आहे तरी ज्यांना सदरचा मिळकत लिलावात बोली बोलून घ्यावयाची असेल त्यांनी संस्थेशी संपर्क साधून मिळकतीची प्रत व ठिकाण लिलावापूर्वी पाहून घ्यावे व लिलावाचे दिवशी व वेळी हजर रहावे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ. नं. | थकबाकीदाराचे नाव व पत्ता | मिळकतीचे ठिकाण | ग्रामपंचायत मि. नं./सि. स. नं./ गट क्र. सर्व्हे नं. | क्षेत्र हे. आर. चौ. फूट | लिलाव करावयाचा हिस्सा | वाजवी मुल्य | लिलावाची तारीख, वार, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मे.प्रितम मेटल्स् प्रो. राजीव उर्फ राजेंद्र रामचंद्र इनामदार, रा. साई गार्डनसमोर विद्यानगर, ता. कराड, जि. सातारा | मौजे सैदापूर साई गार्डनसमोर, विद्यानगर, ता. कराड, जि. सातारा | गट नं. १ उ/११८/५४ त्यावरील ग्रा. पं.मि.नं. ६०९ प्लॉट नं.१/२ | ०१आर ५० चौ.मी. त्यावरील ग्रा.पं.मि.आर. सी.सी.खोल्या ३ व बाथरुम असलेला बंगला दोन्ही फ्लोअर एकूण १७८५ चौ.फूट | संपूर्ण | ७१३११०० | दिनांक ०४/०९/२०२६ वार शुक्रवार वेळ सकाळी ११ ते १.०० ठिकाण यशवंत ग्रा.बि.शेती सह पतसंस्था बनवडी पार्ले, ता.कराड, जि. सातारा |

**टीप :-** १) लिलावाच्या अटी व शर्तीचे वाचन लिलावाचे वेळी करण्यात येईल, २) लिलावापूर्वी कर्ज खाते बंद झाल्यास लिलाव रद्द करण्यात येईल, ३) कोणतेही कारण न दाखवता लिलाव मंजूर अगर नामंजूर करणे, स्थगित करणे वा पुढे ढकलणे याबाबतचे अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवले आहेत, ४) लिलावात भाग घेणेसाठी बयाणा रक्कम रु.२०,०००/- भरणा करावी लागेल. ५) यशस्वी बोलीधारकास लिलावाचे दिवशी एकूण बोली रकमेपैकी १५% रक्कम लिलाव अनामत म्हणून भरावी लागेल.

ठिकाण - कराड
दिनांक-१२/०८/२०२६
(शिक्का)
सही/- **श्री. आशिष सुरेश क्षीरसागर**
**वसुली अधिकारी**
सातारा जिल्हा सह. पतसंस्थांचे फेडरेशन लि., सातारा

महाराष्ट्र शासन
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,वाई, ता. वाई**
**जि.सातारा मध्यवर्ती प्रशासकीय इमारत तिसरा मजला वाई-४१२८०३**
E-mail- arcswai2016@gmail.com

जा.क्र./४६९ /कक्ष-२/जाहीर प्रकटन/२०२६ — दि.१२/०८/२०२६

**जाहीर प्रकटन (फक्त सभासदांसाठी)**
परिशिष्ठ ''अ''

| अ. क्र. | कार्यक्रमाचा तपशिल | दिनांक व वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करणे | १३/०८/२०२६ | संस्था कार्यालय व तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, वाई, ता. वाई कार्यालय नोटीस बोर्ड |
| २ | प्रारुप मतदार यादीवर हरकती व आक्षेप नोंदविणे | १३/०८/२०२६ ते १८/०८/२०२६ स.११ ते दु. ३.०० वा. पर्यंत | तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था वाई, ता.वाई |
| ३ | प्रारुप मतदार यादीवर आलेल्या हरकती व आक्षेपवर निर्णय घेणे | २४/०८/२०२६ | |
| ४ | अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करणे. | २४/०८/२०२६ स. ११.०० वा. | संस्था कार्यालय व तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, वाई, ता. वाई कार्यालय नोटीस बोर्ड |

| अ. क्र. | संस्थेचे नाव |
|---|---|
| १ | आचार्य नागरी सहकारी पतसंस्था मर्या., वाई, ता. वाई, जि. सातारा |

टीप- प्रारूप यादी हरकत/दावेबाबत सबळ पुराव्यानिशी घेण्यात यावे. शासकीय सुट्टीचे दिवस वगळून निवडणूक कामकाज सुरु राहील.

(शिक्का)
सही/- **अनिल क्षीरसागर** तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाई, ता.वाई, जि.सातारा

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
A GOVT. OF INDIA UNDERTAKING
एक परिवार एक बैंक

**ॲसेट रिकव्हरी शाखा,**
**नवी मुंबई, शॉप नं. जी-९ आणि १०, लोकमान्य टिळक, शॉपिंग सेंटर, प्लॉट नं. ८, सेक्टर-१, वाशी, नवी मुंबई - ४००७०३.**
**ई-मेल :** brmgr2259@mahabank.co.in : bom2259@mahabank.co.in **फोन : ०२२-२०८७५५०३**

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना (परिशिष्ट-IV-A)**

'सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२' च्या नियम ८ (६) सह वाचल्या जाणाऱ्या नियम ९(१) 'सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२' अन्वये स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनतेला आणि विशेषत: कर्जदार आणि जामीनदार यांना याद्वारे नोटीस देण्यात येते की, बँक ऑफ महाराष्ट्रकडे गहाण ठेवलेल्या/बोजा असलेल्या खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता, ज्याचा ताबा बँक ऑफ महाराष्ट्रच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, त्यांची बँकेची येणे बाकी वसूल करण्यासाठी ३१.०८.२०२६ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी ३:०० या वेळेत "जसे आहे जिथे आहे", "जसे आहे तसे आहे" आणि "जे काही आहे ते" या तत्त्वावर विक्री केली जाईल. कर्जदार आणि जामीनदार यांचे तपशील, थकबाकी रक्कम, स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि त्यावर ज्ञात असलेले बोजे, ताबा प्रकार, राखीव किंमत आणि बयाना रक्कम (ईएमडी) खालीलप्रमाणे दिली आहे:

| शाखा | कर्जदार/सह-कर्जदाराचे नाव आणि पत्ता | जामीनदार | सुरक्षित मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि ज्ञात असलेले बोजे | मागणी नोटीसनुसार एकूण थकबाकी रक्कम | राखीव किंमत (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| एआरबी नवी मुंबई | **आयुर ऑल इन वन शॉपी प्रायव्हेट लिमिटेड** मजला, सातारा प्लाझा, प्लॉट नं. २०, पाम बीच रोड, सेक्टर १९ डी, वाशी – ४००७०५ ग्रामपंचायत मिळकत नं. ९२३, सर्व्हे नं. ४८५/१/२, मौजे नांदल, ता. फलटण, जि. सातारा | लागू नाही | ग्रामपंचायत मिळकत नं. ९२३, सर्व्हे नं. ४८५/१/२, गाव मौजे नांदल, ता. फलटण, जि. सातारा – ४१५५२८ येथे स्थित औद्योगिक भूखंड आणि लोड बेरिंग जी.आय. शीटचे छत असलेले गोदाम. जमिनीचे क्षेत्रफळ: ८००० चौ. मीटर. **ताबा प्रकार : सांकेतिक ताबा** | दिनांक २७-०९-२०२२ रोजी एकूण ₹३,२४,६६,०००/– + लागू न केलेले व्याज | ₹२,३१,८०,६००/– |

**अनामत रक्कम (ईएमडी) : राखीव किमतीच्या १०%, तपासणीची तारीख : २१.०८.२०२६**
**संपर्क तपशील: श्री. मन मोहन मुर्मू, शाखा व्यवस्थापक, एआरबी शाखा - ९५५२८०८१८५, कु. सानिया खोब्रागडे, व्यवस्थापक, एआरबी - ९०४९३७६४४३**
**वेबसाईट माहिती: विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी कृपया बँकेच्या** https://www.bankofmaharashtra.in/propsale.asp' **या वेबसाईटवर दिलेल्या लिंकचा आणि ई-विक्री पोर्टलचा** (www.baanknet.com) **संदर्भ घ्यावा.**

**तारीख : १४.०८.२०२६**
**स्थळ : नवी मुंबई**

अधिकृत अधिकारी,
बँक ऑफ महाराष्ट्र, नवी मुंबई विभाग